विषय : श्री. अशोक केशवराव मुंडे, बडतर्फ सहाय्यक अभियंता श्रेणी-२ यांना अश्वासित प्रगती योजनेअंतर्गत १२/२४ वर्षांचे लाभ सुधारित करणे बाबत--

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग
आदेश क्रमांक: सा.बा.(उत्तर).आस्था.२/४९७/२०२६
अहिल्यानगर दिनांक- खालील नमूद स्वाक्षरी केलेप्रमाणे

संदर्भ :--१. मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचा निर्णय दि. ०२/०८/२०२२ (याचिका क्र. ८००९/२०२१)
२. ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन पत्र क्र. न्यायप्र-२०२१/प्र.क्र.१३१/आस्था-४ दि.११/१०/२०२३
३. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. अहिल्यानगर यांचे आदेश दि. २३/०५/२०१८
४. पदोन्नती समिती बैठकीचे इतिवृत्त दि. ०२/०३/२०२६

ज्याअर्थी श्री. अशोक केशवराव मुंडे, बडतर्फ सहायक अभियंता श्रेणी-२ यांनी अश्वासित प्रगती योजनेअंतर्गत १२/२४ वर्षांचे लाभ सुधारित करण्याबाबत केलेल्या मागणीवर दिनांक ०२/०३/२०२६ रोजी मा. अध्यक्ष, पदोन्नती समिती तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य), जिल्हा परिषद, अहिल्यानगर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली आहे.

ज्याअर्थी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांच्या निर्णयानुसार तसेच ग्रामविकास विभागाच्या निर्देशानुसार दर्जोन्नती हा अश्वासित प्रगती योजनेअंतर्गत लाभ म्हणून ग्राह्य धरता येत नसल्याने, कनिष्ठ अभियंता पदावरील नियमित नियुक्ती दिनांकापासून १२ वर्षांनी प्रथम लाभ व २४ वर्षांनी द्वितीय लाभ देण्याबाबत विचार करण्यात आला.
त्याअर्थी

१. श्री. अशोक केशवराव मुंडे हे कनिष्ठ अभियंता पदावर दिनांक २६/०२/१९९० रोजी रुजू झालेले असल्याने, त्यांना अश्वासित प्रगती योजनेअंतर्गत पहिला लाभ पूर्वी दिनांक १/४/२००७ पासून मंजूर करण्यात आलेला पहिला लाभ दिनांक १/४/२००२ पासून (उप अभियंता पदाची वेतनश्रेणी १५६००-३९१०० ग्रेड पे-५४००) सुधारीत करण्यात येत आहे.

२. पहिल्या लाभापासून १२ वर्षांनंतर म्हणजेच दिनांक ०१/०४/२०१४ पासून दुसरा लाभ (कार्यकारी अभियंता पदाची (वेतनश्रेणी-१५६००-३९१०० ग्रेड पे-६६००) मंजूर करण्यात येत आहे. श्री. अशोक केशवराव मुंडे यांना दिनांक २०/०४/२०१८ पासून सेवेतून बडतर्फ करण्यात आलेले असल्यामुळे, महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१ मधील नियम ६६ अन्वये दिनांक २०/०४/२०१८ नंतरचे कोणतेही वेतन/भत्ते किंवा आर्थिक लाभ अनुज्ञेय राहणार नाहीत.

३. श्री. अशोक केशवराव मुंडे यांचेकडे कोणतीही शासकीय वसुली (Recovery) असल्यास ती संबंधितांकडून नियमानुसार वसूल करण्यात यावी.

४. तसेच, सुधारित वेतननिश्चितीची वेतन पडताळणी पथकाकडून अर्थविभाग जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेकडून पडताळणी करून घेण्यात यावी व पडताळणीनंतर नियमानुसार देय असलेली रक्कम अदा करावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत असून त्याचा संकेतांक क्र. 202606261300030 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 26-06-2026 16:24:52

आनंद भंडारी (भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री. अशोक केशवराव मुंडे, बडतर्फ सहाय्यक अभियंता
द्वारा- उप अभियंता जि.प.ग्रामिण पाणी पुरवठा विभाग श्रीरामपूर

प्रत- उप अभियंता जि.प.ग्रामिण पाणी पुरवठा विभाग श्रीरामपूर यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत- गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीरामपूर यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी
प्रत मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना माहितीसाठी
प्रत मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी



Scanned with OKEN Scanner